आहे. त्यामुळे एकुण MSL ही ६६१.८५ मी. असल्यामुळे Aviation विभागाचे ना हरकत घ्यावयाची आवश्यकता नाही.

३२) प्रकरणी महाराष्ट्र अधिसूचना दि. २३/०९/२००८ अन्वये स.नं. ४२,४३४४.५१. या जमिनींसाठी शोन करण्यात आला असून शेती ना विभागामधून रहिवास विभागमध्ये बदल केला आहे. सदर बदल करते वेळी अट क्र. 1 प्रश्नाधिन जमिनिंकरीता आवश्यक असण्याऱ्या सर्व पायाभूत सुविधा मिळकत धारक स्वखर्चाने उपलब्ध देतील. अट क्र. २ जागेच्या रेखांकनातील १०% खुल्या जागेव्यतिरीक्त १५% अतिरिक्त क्षेत्रात सुविधा क्षेत्र म्हणून दर्शविणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांनी नकाशांमध्ये १०% खुल्या जागे व्यतिरीक्त अतिरिक्त सुविधा क्षेत्र दर्शविले आहे व विषयांकित मिळकतीसाठी सर्व पायाभूत सुविधा मिळकतधारक यांनी उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

३३) प्रस्तुत जमिनीवर भविष्यात छाननी शूल्क, प्रिमीयम शूल्क, विकास शूल्क, सुरक्षा ठेव व कामगार कल्याण उपकर इत्यादी बाबतच्या रक्कमेची बाकी उद्भवल्यास सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा करणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३४) सदर प्रकरणी कासारसाई उजवा कालवा क्र.७, ८, ९, १० मधील स.नं.४३/८ब, ४४/४बी, ४४/६, ४४/८, ४४/९अ, ४५/१, ४५/२, ४६/१, ४६/४, ४६/५ व ४९/१ वरील कॅनॉल रद्द करणेबाबत उच्च न्यायालयाकडील रिट पिटीशन क्र.८७५४/२०१९ मधील दि.३०/०८/२०१९ निर्णयानुसार वरील इतर हक्कामधील संपादनाची नोंद रद्द करण्याबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार पूर्व मंजुरीनुसार नकाशावर पुर्व मध्ये दर्शविलेला नाला आता दर्शविणेत आलेला नाही. तरी सदर बाबतीत उच्च न्यायालयामध्ये कोणतेही नव्याने दावा दाखल केला नसल्याबाबत अर्जदार यांनी हमीपत्राद्वारे कळविले आहे व सदर विषयाबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन बाब उद्भवल्यास त्यास सर्वस्वी जबाबदारी जमिन मालक/विकासक यांची राहील. तसेच अर्जदार यांनी दि.०३/०५/२०२३ रोजीचे हमीपत्र सादर केलेले आहे. सदरचे हमीपत्र अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३५) सदर प्रकरणी अर्जदार यांनी चलने निर्गमित करणेपूर्वी पाण्याचे हमीपत्र व Form of Statement सादर करणे अर्जदार / विकासक / जमिनमालक यांचेवर बंधनकारक राहील.

३६) अर्जदार यांनी सादर केलेली कोणतीही माहिती अथवा कागदपत्रे ही चुकीची/दिशाभूल करणारी आढळल्यास प्रस्तुतची विकास परवानगी व प्रारंभ प्रमाणपत्र रद्द समजणेत येईल.

प्रस्तावासोबतच्या रेखांकन/बांधकाम नकाशांचे दोन संच स्वाक्षांकित करुन सोबत जोडले असून प्रस्वातावासोबतची अन्य सर्व कागदपत्रे प्राधिकरणाच्या अभिलेखार्थ राखून ठेवण्यात येत आहेत

**मा. महानगर आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्येतेने**

महानगर आयुक्त
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणेकरीता